# विनियम क्रमांक २१/२०२२

**"संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बृहत आराखडा मधील 'ई-सेल' E- Cell च्या बळकटीकरणाकरिता करावयाची उपाययोजना व पद्धतीची निश्चिती व विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचा आणि राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा महाविद्यालयांकडून एकत्रित वार्षिक अहवाल मागविण्यासंदर्भात करावयाची पद्धतीची निश्चिती."**

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(४७)(ज) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध आहे आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(३६) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाळा व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत निरोगी वातावरण, समूह जीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृध्दीसाठी व्यवस्था करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ५६ (१) नुसार विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये नमूद करण्यात आलेली आहेत आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(ड) नुसार विद्यार्थी विकास मंडळाची व विद्यार्थी विकास कक्षाची उद्दिष्टे पूर्ण करता यावीत म्हणून विद्यापीठ प्राधिकरणाकडून नेमून देण्यात येईल असे कोणतेही अन्य काम हाती घेणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(ड) नुसार गट (राजकीय पक्ष वगळता), समाज व अन्य व्यावसायिक मंडळे यांना, विद्यार्थी विकास मंडळाच्या कामांमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यामधील तरतूद क्र. ५.१६.७ नुसार उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पाठपुरावा करणे याकरीता विद्यापीठाने विद्यार्थ्यांची माहिती गोळा करणे, माजी विद्यार्थ्यांना चालु सत्रामध्ये प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी आमंत्रित करणे, समाज माध्यमाव्दारे व नेटवर्किंगव्दारे विद्यार्थ्यांशी संपर्क राहण्याकरीता ''ई-सेल'' ची स्थापना करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये विद्यापीठाचा दर्जा उंचविण्याच्या दृष्टीने नमुद करण्यात आलेली विविध उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी कार्यबल गटाचे गठण करण्यात आले आहे. त्यानुषंगाने खालील बाबी विद्यार्थी विकास मंडळाव्दारे राबविण्यात यावे असे निर्देश दिले आहे आणि;

ज्याअर्थी, सदर योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून विनियमावली तयार करण्यात आली असून विद्यार्थी विकास मंडळ सभा दिनांक २७.१०.२०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ५१ नुसार प्रारुप विनियमावलीस मान्यता प्रदान करण्यात आली आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१) मधील (द) नुसार विनियम प्रारुपास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस सादर करण्याकरीता सर्वाधिकार अधिष्ठाता मंडळास बहाल करण्यात आले आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परीषद विनियम करतील अशी तरतूद आहे, आणि;

त्याअर्थी, व्यवस्थापन परीषद पुढील प्रमाणे विनियम विहित करतील :

०१, सदर विनियम **" संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बृहत आराखडा मधील 'ई-सेल' E- Cell च्या बळकटीकरणाकरिता करावयाची उपाययोजना व पद्धतीची निश्चिती व विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचा आणि राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा महाविद्यालयांकडून एकत्रित वार्षिक अहवाल मागविण्यासंदर्भात करावयाची पद्धतीची निश्चिती."** विनियम – २०२२ असे संबोधण्यात येईल.

०२. व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून अंमलात यईल.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बृहत आराखडयामधील उपरोक्त बाबींची पूर्तता करण्याकरीता खालीलप्रकारे कार्यप्रणाली निर्धारीत करण्यात येत आहे.

०१. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बृहत आराखड्यानुसार पदव्युत्तर शैक्षणिक विभागांमध्ये शिकत असणारा विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जात असतांना त्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक प्रवास, अद्यावत माहिती संकलित करणे. तसेच माजी विद्यार्थ्यांना आमंत्रित करून त्यांचा डेटाबेस जमा करून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग शिकत असणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना व्हावा. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ज्ञानाची आदान-प्रदान होणे याकरिता सोशल मीडियाचा वापर तसेच इंटरनेटच्या माध्यमातून वा संकेतस्थळाच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना एकत्र आणणे या उद्देशाने 'ई-सेल' ची स्थापना करण्यात यावी.

०२. या उद्देशाच्या पूर्ततेकरिता स्वतंत्र संकेतस्थळ स्थापन करण्यात यावे किंवा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंकद्वारे स्वतंत्र पेज किंवा पोर्टल तयार करण्यात येऊन त्याद्वारे प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा संपूर्ण माहिती संकलित करण्यात यावी. या पेजवर प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांना स्वतंत्र युजरनेम व पासवर्ड द्यावा, जेणेकरून विद्यार्थी आपली माहिती वेळोवेळी या पेजच्या माध्यमातून अद्यावत करु शकतील. विद्यार्थी शिकत असताना तो वेगवेगळ्या उच्च शिक्षणाच्या प्रवेशाकरिता तसेच नोकरी करीता लागणाऱ्या पूर्व परीक्षा देत असतो यासंबंधीची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांनी वेळोवेळी या पोर्टलवर किंवा पेजवर भरल्यास भविष्यामध्ये किंवा विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माजी विद्यार्थी म्हणून त्यांची माहिती NAAC किंवा तत्सम एजन्सी च्या मूल्यांकनासाठी महत्त्वाचा ठरेल.

०३. या स्वतंत्र वेब पेजच्या माध्यमातून शिकत असणारा विद्यार्थी माजी विद्यार्थ्यासोबत संपर्क करू शकतो, तसेच शिकत असताना भविष्यासाठी लागणारे ज्ञान, माहिती त्यांच्याकडून प्राप्त करू शकेल. याच माध्यमातून माजी विद्यार्थ्यांचे नोकरी किंवा व्यवसाय संदर्भात मार्गदर्शन व भविष्याच्या संधी यावर व्याख्यानाचा कार्यक्रम त्यांच्या विभागांमध्ये आयोजित केल्या जाऊ शकतो.

०४. हे स्वतंत्र संकेतस्थळ वा वेबपेज माजी विद्यार्थी संघटनेच्या संकेतस्थळाशी लिंक असावे किंवा दोन्ही विषयाकरिता एक स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती करण्यात यावी जेणेकरून शिकत असणाया विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती व त्यानंतर माजी विद्यार्थी म्हणून सदर माहिती संकलित करता येईल.

०५. या 'ई-सेल' च्या माध्यमातून शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे सामाजिक, आर्थिक अडचणी यावर माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांच्या मदतीने उपाययोजना करण्यास सोपे जाईल. यासोबतच हे सर्व विद्यार्थी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांशी जोडले जावे याकरिता या ई-सेलच्या माध्यमातून तयार झालेल्या डेटाबेसचा वापर करण्यात यावा.

०६. **विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचा आणि राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा महाविद्यालयांकडून एकत्रित वार्षिक अहवाल मागविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे राहील.**

विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व उपक्रम, बाबींचा, कार्यक्रमांचा महाविद्यालयातून वार्षिक अहवाल विद्यार्थी विकास विभागाच्या ऑनलाइन पोर्टल द्वारा एकत्रितपणे मागविण्यात यावा. या अहवालाकरीता खालील प्रमाणे माहितीचे पोर्टल महाविद्यालयांसाठी तयार करण्यात यावे.

**विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचा आणि राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा महाविद्यालयांचा एकत्रित वार्षिक अहवाल**

| | | |
|---|---|---|
| ०१. | महाविद्यालयाचे नाव व संकेतांकः | |
| ०२. | महाविद्यालयाचा संपर्क/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ०३. | महाविद्यालयाचा ई-मेल : | |
| ०४. | महाविद्यालयाचे प्राचार्याचे नावः | |
| ०५. | प्राचार्यांचा संपर्क / भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ०६. | प्राचार्यांचा ई-मेल : | |
| ०७. | महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांचे नावः | |
| ०८. | विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांचा संपर्क / भ्रमणध्वनी क्रमांक : | |
| ०९. | विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांचा ई-मेल : | |

## I. Equal Opportunity Cell

| | |
|---|---|
| **What Facilities should be Available for Physically Challenged Students in the College.** (*Provide facilities that would encourage full participation for students with disabilities, such as wide ramps at entrances and accessible toilets, sanitation facilities, drinking water, library/laboratory/class room easy access.*) | |
| **Number of Students Benefiting from Scholarship/ Schemes for economically and socially Challenged Students.** (*Mention the names of schemes and total number of benefitted students*) | |

## II. Placement Cell

| | |
|---|---|
| **Number of students covered by the Placement Cell.** (*Mention the total number of students who were engaged in the various activities of Placement Cell*) | |
| **Number of Students actually Placed.** (*Mention the total number of students who were actually placed in campus/out of campus .*) | |

## III. Music, Arts & Cultural Cell

| | |
|---|---|
| College participate in Inter University Youth Festivalv? | Yes/No |
| **College participates in total events (Number).** *(Actual Participation of students in various events in Inter University Youth Festival )* | |
| **Total number of students selected in University team.** *(Students selected in University team to represent the Indradhanushya, National Qawwali, Central zone, National and SAUFEST))* | |
| Total number of events related to the Music, Arts & Cultural Cell organized/participated in the academic year. | |
| **Other Special program/events organized/participated.** | |

## IV. Student Development Cell/ Career Counseling Cell

| | |
|---|---|
| Number of students counseled and guided in academic year. | |
| Number of courses conducted per year on life skill and value education. | |
| Number of students benefitted per year by the courses on life skill and value education. | |
| Number of students benefitted per year by the Centre's for training in competitive examination. | |
| Number of students benefitted from "Sant Gadge Baba Earn and Learn schemes". | |
| Number of students benefitted from "Sant Gadge Baba Girl Student Bus Pass Concession Scheme ". | |
| Number of students benefitted from "Sant Gadge Baba Education Protection Scheme". | |
| Number of students benefitted from "Sant Gadge Baba Vidhyadhan Yojana". | |

| | |
|---|---|
| Number of students benefitted from "Prof. Ramprakash Shamlalji Rathi Memorial Scholarship". | |
| Number of students benefitted from "Students Development Fund Scholarship". | |
| Number of students benefitted from "Sant Gadge Baba Students Safety Insurance Policy Scheme". | |
| Number of students benefitted from "Soft Skill Development Scheme/Workshop". | |
| Number of students benefitted from "College Students Responsibility Fund Scheme". | |
| Total amount disburse to the benefited students from "College Students Responsibility Fund Scheme". | |

**V. College Grievance Redressal Cell (CGRC)**

| | |
|---|---|
| Total number of complaints filed in CGRC. | |
| Total number of complaints resolved in the grievance within period of fifteen days of receiving the complaint. | |
| Total number of Grievance not resolved by CGRC and referred to University Grievance Redressal Cell (UGRC). | |

**VI. Ragging and Sexual Harassment (of Students) Cell/Committee**

| | |
|---|---|
| Total number of complaints raised for ragging . | |
| Total number of complaints resolved for ragging by anti ragging squad and anti ragging committee. | |
| Total number of complaints raised for sexual Harassment of Students. | |
| Total number of complaints resolved of sexual Harassment of Students by committee. | |

विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांची स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का

*****